न्यायालयीन प्रकरणांमध्ये जिल्हाधिकारी व भुसंपादन संस्था वा त्यांचा प्रशासकीय विभाग यांनी दाखल करावयाच्या शपथपत्राबाबत.

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**शासन परिपत्रक क्र: संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२३४/भूसंपादन-०२**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दि.१७.०७.२०२५.

**वाचा**:- शासन अधिसुचना क्र.संकिर्ण-११/२०१४/प्र.क्र.७७ (भाग-२)/अ-२, दि.११.०९.२०१५.

**प्रस्तावना** :-

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ तसेच केंद्र व राज्य शासनाच्या इतर अधिनियमातील तरतुदीनुसार विविध प्रकल्पासाठी (जसे सिंचन प्रकल्प, राष्ट्रीय /राज्य महामार्ग, विमानतळ, पुनर्वसन, पाझर तलाव, गावठाण विस्तार इ.) संबंधित भुसंपादन संस्था /प्रशासकीय विभागाच्या मागणीनुसार खाजगी जमीनीची भूसंपादन प्रक्रिया जिल्हाधिकारी वा अधिसूचित भूसंपादन अधिकारी यांचेमार्फत पार पाडुन अशा जमिनी सार्वजनिक प्रयोजनासाठी त्या त्या भुसंपादन संस्थाकडे सुपुर्द करण्यात येतात.

०२. भुसंपादन निवाड्याप्रकरणी भुधारक अथवा भुसंपादन संस्था यांचेमार्फत दाखल होणाऱ्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये राज्य शासनाच्या वतीने महसुल व वन विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रतिवादी करण्यात येते. तथापि, अशा प्रकरणी भूसंपादन अधिकारी व भूसंपादन संस्थेमार्फत सविस्तर शपथपत्रे दाखल न झाल्याच्या पार्श्वभुमीवर मा. न्यायालयाकडुन विशिष्ठ कालमर्यादेत कार्यवाही करण्याचे निर्देश प्राप्त होतात आणि अशा निर्देशाचे पालन न झाल्याने दाखल होणाऱ्या अवमान याचिकेमध्ये शासनपातळीवरील वरिष्ठ अधिकाऱ्यांना व्यक्तीगत प्रतिवादी म्हणून न्यायालयामध्ये उपस्थित राहणे अशा बाबींना सामोरे जावे लागत असल्याचे खेदाने नमुद करण्यात येत आहे.

०३. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता मा. न्यायालयासमोर राज्य शासनाच्या भुमिकेबाबत एकवाक्यता व समन्वय राहण्यासाठी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ या अधिनियमाखाली राज्य व केंद्र शासनाच्या प्रकल्पांसाठी सुरु असलेल्या भुसंपादन प्रकरणांसाठी पारीत अधिसुचना क्र. संकीर्ण-११/२०१४/प्र.क्र. ७७ (भाग-२)/अ-२, दि.११.०९.२०१५ व इतर शासन निर्णय/परिपत्रके विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

**शासन परिपत्रक :-**

१. मा. न्यायालयामध्ये प्रलंबित व नव्याने दाखल होणाऱ्या सर्व प्रकरणी पुढील/ प्रथम सुनावणीच्या वेळी भुसंपादन प्रकरणाशी निगडीत भुसंपादन संस्था व त्यांचा प्रशासकीय

विभाग यांना प्रतिवादी करण्यात आले असल्याची जिल्हाधिकारी यांनी खातरजमा करावी अन्यथा मा. न्यायालयाच्या मान्यतेने राज्य व केंद्र शासनाच्या भूसंपादन संस्था/ संबंधीत प्रशासकीय विभागास प्रतिवादी करण्याची कार्यवाही विनाविलंब करावी.

२. जिल्हाधिकारी यांनी याचिकाकर्त्यांची मागणी ही भुसंपादन अधिकारी अथवा भुसंपादन संस्था यांच्याशी निगडीत आहे याची खातरजमा करुन सदर मागणीबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे संबंधितांना निर्देश द्यावेत. तसेच मागणीच्या अनुषंगाने भुसंपादनाशी निगडीत बाबींसंदर्भात भुसंपादन अधिकारी यांच्यामार्फत शासन अधिसुचना दि.११.०९.२०१९ मधील समुचित शासन (Appropriate Government) या संदर्भातील तरतुद, भुसंपादनाची सद्य:स्थिती इत्यादी बाबी स्वयंस्पष्ट शपथपत्राद्वारे मा. न्यायालयाच्या निर्दशनास आणण्याचे निर्देश देण्यात यावेत.

३. तसेच भुसंपादन संस्थेशी निगडीत बाबींसंदर्भात संबंधित प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता, वित्तीय तरतुदी व निधी उपलब्धता यासाठी यासोबतच राज्य शासन (State Government) म्हणुन संबंधित प्रशासकीय विभागाची जबाबदारी विचारात घेऊन प्रशासकीय विभागामार्फत मा. न्यायालयामध्ये वस्तुस्थितीदर्शक शपथपत्र दाखल करण्याची आवश्यकता संबंधित प्रशासकीय विभाग प्रमुखांच्या निदर्शनास आणावीत. तसेच अशी शपथपत्रे मा. न्यायालयामध्ये विनाविलंब सादर होतील यासाठी संबंधीत भूसंपादन संस्थेचे प्रमुख जबाबदार राहतील.

४. भूसंपादन प्रक्रिया व्यपगत झालेल्या सर्व प्रकरणांमध्ये भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील तरतुदीनुसार व्यपगत भुसंपादन प्रकरणाची कायदेशीरता, भुसंपादन संस्थेस तातडीने कळविण्यात यावी. तसेच याचिकाकर्त्याच्या जमिनीची मालकी, त्यामधील हक्क/हितसंबंध, सद्य:स्थिती व अशी जमीन नव्याने संपादीत करावयाची असल्यास त्याबाबत भूसंपादन संस्थेची भूमिका या सर्व बाबी विचारात घेऊन संबंधित प्रशासकीय विभागाने राज्य शासन म्हणुन शपथपत्र दाखल करावे. याशिवाय भूसंपादन प्रक्रिया न राबविता संबंधित भूधारकाच्या सहमतीने परस्पर ताबा घेण्यात आलेल्या जमिनीबाबतच्या प्रकरणी सविस्तर शपथपत्र दाखल करण्याची जबाबदारी भूधारक संस्था/संबंधित प्रशासकीय विभागाची राहील.

५. तसेच प्रलंबित व नव्याने दाखल होणाऱ्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये भूसंपादन अधिनियमाशी निगडित तरतुदींचा/धोरणात्मक बाबींचा अन्वयार्थ याबाबत या विभागाच्या वतीने विनिर्दिष्टपणे शपथपत्र दाखल करणे आवश्यक असल्यास त्याबाबतच्या कारणमीमांसेसह महसूल व वन विभागास (भूसंपादन शाखा) अवगत करावे.

६. मा. न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध अपील/ पुनर्विलोकन दाखल करण्यासाठी सरकारी वकीलांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय घेऊन ज्या मुद्दयांच्या आधारे वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल करावयाचे असे मुद्दे त्याबाबतची कागदपत्रे आणि Rules for Conduct of Legal Affairs of the Government, १९८४ मधील Rule ७ नुसार स्वयंस्पष्ट प्रस्ताव शासनास

सादर करण्याची दक्षता घ्यावी. तसेच संबंधित भूसंपादन संस्थेने असे प्रस्ताव संबंधीत प्रशासकीय विभागामार्फत सादर करावेत.

७. भूसंपादन संस्थेस आवश्यक असणारी जमीन थेट खरेदीने करावयाच्या प्रकरणी, थेट खरेदी भूसंपादन अधिनियमाबाहेरील असल्याने याबाबत दि.२५.०१.२०१७ अन्वये निश्चित केलेली कार्यपद्धती, विविध मार्गदर्शक सुचना विचारात घेऊन आस्थापना शुल्क व सोईसुविधा शुल्क जमा करून थेट खरेदीबाबतची कार्यवाही अंतिम करण्याची संपुर्ण जबाबदारी प्रादेशिक विभागाच्या/प्राधिकरणाच्या/महामंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांची व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाची आहे. अशा थेट प्रकरणाबाबतचा प्रस्ताव प्रादेशिक विभाग/प्राधिकरण वा महामंडळाचा असल्याने अशा प्रस्तावाशी निगडीत प्रकरणाबाबत प्रशासकीय, न्यायालयीन आणि विधानमंडळविषयक बाबीचे उत्तरदायित्व संबंधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे आहे.

८. ज्या प्रकरणी भूसंपादन प्रक्रिया पुर्ण होऊन भूसंपादीत जमिनीचा ताबा भूसंपादन संस्थेकडे सार्वजनिक प्रयोजनासाठी सुपुर्द करण्यात आला आहे, अशा प्रकरणी असे सार्वजनिक प्रयोजन वा तद्नंतरच्या अनुषंगिक बाबी याबाबतची प्रशासकीय/ न्यायालयीन/ विधानमंडळविषयक बाबींची जबाबदारी संबंधीत भूसंपादन संस्था /संबंधीत प्रशासकीय विभागांची राहील. तथापि, उपरोक्त परि. क्र ५ मध्ये नमूद केल्यानुसार भूसंपादन अधिनियम/ शासन निर्णय/ परिपत्रके यामधील तरतुदींचा अन्वयार्थ याबाबतचा अंतिम निर्णय या विभागाचा राहील.

९. सदरहू शासन परिपत्रकामधील उपरोक्त सुचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत असल्याची खातरजमा संबंधित सर्व विभागीय आयुक्त यांनी करावी. तसेच अशा प्रकरणांचा दरमहा आढावा घेऊन याबाबतचा अहवाल उपायुक्त (भुसंपादन/ पुनर्वसन) विभागीय आयुक्त कार्यालय यांच्या स्वाक्षरीने शासनास दरमहा सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्र. २०२५०७१७१८२८३३६५१९ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( माणिक ढमाले )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत**:-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अ.मु.स., मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, उप मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई.
४) मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, उप मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई.

५) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८) मा. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) मा. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) मा. अपर मुख्य सचिव (वने, भूसंपादन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१२) सह सचिव (भूसंपादन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) सर्व विभागीय आयुक्त.
१४) सर्व जिल्हाधिकारी.
१५) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडकोभवन, सि.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
१६) मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
१७) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, मुंबई.
१८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.
१९) प्रादेशिक अधिकारी, मुंबई, महाराष्ट्र, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय,नवी मुंबई.
२०) प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नागपूर प्रादेशिक कार्यालय, नागपूर- ४४००३३.
२१) संचालक, नगर रचना, पुणे.
२२) मुख्य अभियंता, मध्य व पश्चिम रेल्वे, मुंबई.
२३) मुख्य अभियंता, मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लि. मुंबई.
२४) महाराष्ट्र विमाळतळ विकास कॉर्पोरेशन लि., मुंबई
२५) सर्व भूसंपादन अधिकारी.
२६) सर्व उपायुक्त भूसंपादन (कोकण,पुणे,नाशिक,छत्रपती संभाजीनगर,नागपूर,अमरावती)
२७) महाव्यवस्थापक (भूमि व सर्वेक्षण), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., मुंबई.
२८) सर्व अधिक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम / जलसंपदा)
२९) निवडनस्ती- (भूसंपादन-२).